Newspaper Coverage – Life Lab at Rajarshi Shahu Maharaj School – 12/4/2017

पुणे शहर
TODAY
सकाळ
८



मुंढवा : राजर्षी शाहू महाराज शाळेत आयोजित केलेल्या विज्ञान प्रदर्शनातील प्रकल्प पाहताना लीना देशपांडे व रूपा म्हसकर.

## राजर्षी शाहू शाळेत विज्ञान प्रदर्शन

मुंढवा, ता. ११ : येथील राजर्षी शाहू महाराज प्राथमिक शाळेत दोन वर्षांपासून भारत फोर्जतर्फे विज्ञान प्रयोगशाळा सुरू करण्यात आली. या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विज्ञानावर आधारित तयार केलेल्या प्रकल्पांचे प्रदर्शन नुकतेच आयोजित करण्यात आले. प्रदर्शनाच्या उद्‌घाटनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उस्मानाबाद जिल्हा परिषदेचे सदस्य धीरज कदम, भारत फोर्जच्या 'सीएसआर' प्रमुख लीना देशपांडे, नगरसेविका चंचला कोद्रे, नगरसेवक बंडू गायकवाड, सहायक प्रशासकीय अधिकारी विजय आवारी, मुख्याध्यापिका रूपा म्हसकर, विद्यानिकेतनच्या मुख्याध्यापिका सुनीता कोद्रे आदी उपस्थित होते. देशपांडे म्हणाल्या, "विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण व्हावी. त्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा, हा या उपक्रमाचा उद्देश आहे." कदम म्हणाले, "समाजाचा खरा आधार असणाऱ्या विद्यार्थी वर्गासाठी आणि विशेषतः महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम सुरू करून भारत फोर्ज कंपनीने सामाजिक बांधिलकी जपली आहे." कोद्रे व गायकवाड यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जगदीश लाड व देवानंद रोकडे यांनी केले. आभार मानसी पाटील यांनी मानले.